**दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, सांगोला यांचे न्यायालयात.**
**नियमित दिवाणी मुकदमा नं. २२९/२०१४**
**निशाणी ७३ खालील आदेश**

(शोभावती वाघमोडे व इतर वि. शिवाजी भगवान पाटील)

प्रस्तुतचा अर्ज वादी क्र. ६ हिचे वारसांतर्फे वादी क्र. ०६ यांचे विरुध्द झालला दावा अबेटचा आदेश रद्द होवून मिळावा, यासाठी दाखल केलेला आहे.

**०२.** वादी क्र. ६ चे वारसांचे कथनानुसार, सदरहू दावा वादींनी प्रतिवादी यांचे विरुध्द निरंतर ताकीदीचा दाखल केला असून दाव्यामध्ये सैदाबी अब्बास तांबोळी ही वादी क्र. ६ म्हणून आहे. सदर वादी क्र. ६ ही दि. २४/०९/२०२० रोजी दावा प्रलंबित असताना मयत झाली आहे. ती मयत झाली त्यावेळी कोरोनाचा प्रादुर्भाव चालू होता. कोरोनामुळे कोर्ट कामकाज पूर्णपणे चालू नसलेमुळे व सदर दाव्याची माहिती वादी क्र. ६ चे वारसांना नसलेमुळे व सदरची माहिती दि. ०५/११/२०२२ रोजी वादी क. १ कडून समजलेमुळे ताबडतोब अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे दावा वादी क्र. ६ बाबतीत अबेट झाला आहे. तरी वादी क्र. ६ विरुध्द झालेला दावा अबेटचा आदेश रद्द कणेत यावा अशी विनंती केली आहे.

**०३.** सदर अर्जास प्रतिवादीतर्फे म्हणणे देऊन त्यांनी असे कथन केले की, वादीचा अर्ज खोटा व लबाडीचा असून तो प्रतिवादीस मान्य नाही. वादीने विलंब माफीचे अर्जास दिलेले कारण खोटे आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली आहे.

**०४.** सदरच्या अर्जावर दोन्ही वकिलांचा युक्तिवाद ऐकला. सदरचा दावा चालू असताना वादी क्र. ०६ सैदाबी अब्बास तांबोळी या मयत झाल्या आहेत. त्यामुळे त्यांचे वारस या दाव्याचे कामी सामील करणे आवश्यक आहे. सदर वादी क्र. ६ यांचे विरुध्द दावा अबेटमेंटचा आदेश पारित झालेला आहे. सदर कथनाच्या पृष्टयर्थ वादी यांनी निशाणी ७४ वर शपथपत्र दाखल केले

आहे. प्रस्तुतचा दावा निरंतर ताकीद मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. दाव्यातील मागणी पाहता वादाचा विषय गुणदोषांवर निर्गत होणे आवश्यक आहे. त्यासाठी वादी क्र. ०६ यांचेविरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द होणे आवश्यक आहे. जर वादी क्र. ६ चे वारसांना वादी क्र. ०६ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्याची संधी देवून त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिली नाही तर ते त्यांच्या न्यायहक्कापासून वंचित राहू शकतात. त्याहीपेक्षा तुर्तास दावा अत्यंत प्राथमिक स्वरुपात आहे. ही बाब निश्चितपणे जाणवते की, वादीच्या कृत्यामुळे प्रतिवादीस विनाकारण विलंब आणि मानसिक त्रास सहन करावा लागला, परंतू सदरची बाब ही वादीवर आर्थिक भूर्दंड लादल्यानंतर काहीअंशी कमी करता येवू शकते. याउलट, अर्ज नामंजूर केल्याने प्रक्रियात्मक विलंब वाढून आणखी जटील बनू शकते. वरील सर्व कारणांचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो –

## आदेश

१. अर्ज नि. ७३ चा अर्ज वादी क्र. ६ चे वारसांनी रक्कम रु. ३००/– प्रतिवादीस दंड देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. वादी क्र. ०६ यांचे विरुध्द झालेला अबेंटमेंटचा आदेश रद्द करण्यात येतो.

सांगोला (श्री. संजय मो. घुगे)
दिनांक – ०३/०७/२०२३. दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, सांगोला.